**जलप्रदाय विशेष समितीची बैठक शुक्रवार दि. 30.06.2017 रोजी सकाळी 10.30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात संपन्न झालेल्या सभेचा अहवाल.**

**सभेत मा.सभापती श्री. राजेश घोडपागे, मा.उप सभापती श्री.महेंद्रप्रसाद धनविजय, मा. सदस्य श्री.शेषराव गोतमारे, मा.सदस्या श्रीमती रूपाली ठाकुर, मा.सदस्या श्रीमती नेहा निकोसे व विशेष आमंत्रित म्हणून मा.सत्तापक्षनेते श्री. संदीप जोशी तसेच प्रशासनाकडून अधिक्षक अभियंता(जलप्रदाय विभाग), सहा.आयुक्त, उप विभागीय अभियंता आणि ओ.सी.डब्लू.चे अधिकारी उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. सुरूवातीला विषय पत्रिकेवरील one time settlement या विषयाच्या अनुषंगाने चर्चा करीत असतांना मा.सत्तापक्ष नेते यांनी सांगितले कि, जलप्रदाय समितीच्या बैठकीत 30 जूनपर्यंत संपुर्ण रक्कमेवरील शास्ती माफ करण्याचे ठरविण्यात आले आहे. ही योजना मोठया प्रमाणात महानगरपालिकेद्वारे राबवायची आहे. मागच्या वेळेस ज्या 1200 करदात्यांनी अर्धवट पैसे भरले आणि त्यावेळेस उरलेला अमाऊंट होता तो वापस घेवून one time settlement फायदा त्यांना द्यावा हा एक विषय होता आणि दुसरा असा विषय आहे की प्रभागात असे कोणकोणते करदाते आहेत की ज्यांनी अर्धवट पैसे भरले आहे त्यांचा शोध घेवून त्यांना शेवटची संधी देणे. स्थायी समितीच्या सभेमध्ये अंतिम ठराव असाही झाला आहे की येणा–या 5 वर्षाच्या काळात म्हणजेच 2022 पर्यंतच ही अंतिम संधी राहणार आहे. त्यामुळे ताबडतोब करदात्यांशी संपर्क करून 6 जुलै ते 15 जुलै या कालावधीमध्ये एकमुस्त रक्कम घेवून हा विषय समाप्त करण्यात यावा. मात्र ज्या करदात्यांनी करंट बील भरलेले आहे त्यालाच ही संधी देता येणार आहे. हे करीत असतांना सर्व कॅटेगरीतील करदात्यांवरील 31 मार्चपर्यंतचे व्याज माफ केलेले आहे आणि ही अंतिम संधी राहणार आहे. जर या दहा दिवसात नागरिकांनी पैसे भरले नाही तर प्रशासनाकडून मोठया प्रमाणात नळ कापणीची मोहीम सुध्दा राबविणार.

one time settlement या योजनेकरिता जाहिरात करणे आवश्यक आहे. याकरिता मोठया प्रमाणात पत्रके वाटून, मोठमोठया होर्डिंग लावून आणि वर्तमानपत्रात जाहिरात देवून या योजनेला प्रसिध्दी द्यावयाची आहे. मा.नगरसेवकांच्या घरांवर बॅनर लावून सुध्दा प्रसिध्दी द्यावयाची आहे. जलकराप्रमाणे मालमत्ता कराची सुध्दा सोबतच जाहिरात करण्यात यावी. कलेक्शन सेंटर आहेत ते कमी पडू नयेत म्हणून अतिरिक्त कलेक्शन सेंटर उभारण्यात यावेत आणि महानगरपालिकेच्या गाडयावरती बॅनर लावून प्रभागात फिरविण्यात याव्यात जेणेकरून लोकांना याची माहिती मिळेल. नागपूर शहराची एकंदरीत थकीत करदात्यांची आणि झोनवाईज करदात्यांची यादी सर्व नगरसेवकांना देण्यात यावी. हे करीत असतांना नियमित करदात्यांना

त्यांच्या बीलात 1 टक्के सुट देण्यात येईल असे एनईएसएल बोर्डाने मंजूर केले आहे असेही त्यांनी सांगितले.

सभेत one time settlement च्या विषयाच्या अनुषंगाने संबंधित उपस्थित अधिकारी, कर्मचा–यांकडून सुझाव मागण्यात आले असता या योजनेला दिलेला वेळ हा अत्यंत अल्प असून या योजनेचा अवधी वाढवून देण्यात यावा. जेणेकरून जाहिरात केल्यानंतर जास्तीत जास्त लोकांना माहिती मिळून जास्तीत जास्त लोक या योजनेचा फायदा घेवू शकतील तसेच नागरिकांना रक्कम भरतांना इन्स्टॉलमेंट रूपाने रक्कम भरण्याची सुविधा देण्यात यावी. अशाप्रकारे बहुतांश सुझाव देण्यात आले.

सभेत आलेल्या सुझावाच्या अनुषंगाने one time settlement या योजने करिता 17 जुलै ते ते 7 ऑगस्ट इतका कालावधी सर्वानुमते ठरविण्यात आला. रक्कम भरतांना इन्स्टॉलमेंटची सुविधा देण्यात यावी असेही ठरविण्यात आले.

शेवटी मा.सभापती, जलप्रदाय विशेष समिती श्री.घोडपागे यांनी सभेत निर्देशित केले कि one time settlement या योजने करिता 17 जुलै ते ते 7 ऑगस्ट या कालावधीत ही योजना राबविण्यात यावी. प्रत्येक नगरसेवकांना नागपूर शहराची थकीत करदात्यांची एकंदरीत यादी आणि झोनवाईज करदात्यांची यादी देण्यात यावी. सर्वांना मिळून पुर्ण मेहनतीने काम करावयाचे आहे असे सुचित करून मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका**

**सभापती**
**जलप्रदाय विशेष समिती**

म.न.पा. ठराव कमांक 8 दिनांक 20.3.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30(3)नुसार गठीत जलप्रदाय विशेष समितीची सभा मंगळवार दिनांक 5.12.2017 रोजी दुपारी 3.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचे इतिवृत्त.

सभेत मा.सभापती समिती श्री राजेश घोडपागे, मा. उपसभापती श्रीमहेन्द्रप्रसार धनविजय, मा. सदस्या श्रीमती रुपाली ठाकुर, मा. सदस्य श्री जुल्फेकार भुट्टो कार्यकारी अभियंता जलप्रदाय जलप्रदाय विभागाचे सर्व झोनचे उप अभियंता ओ.सी.डबलु चे अधिकारी इत्यादी उपस्थित होते.

सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

विषय कमांक 1 नुसार दुषित पाणी तथा लो प्रेशर संबंधी तकारीचा आढावा झोन निहाय घेण्यात आला यात झोन कमांक 1 व्दारे सांगण्यात आले की 1 तकार आली आहे यावर मा. उपसभापती श्री धनविजय यांनी गोपालनगर येथे रिस्टोरेशन का करण्यात आलेले नाही याबाबत श्री प्रमोद तभाने यांची या संदर्भात तकार आहे. असे सांगीतले त्यावर आन गोईग कनेक्शन बॅलेस असल्याबाबत विभागाव्दारे सांगण्यात आले.

झोन कमांक 2 व्दारे सांगण्यात आले की 8 तकारी पेंडींग आहे 3 तकारी लो प्रेशरच्या आहे त्या 8 दिवसात निकाली काढण्यात येतील. या वेळी समितीव्दारे कोलबास्वामी, विद्यानगर ,रक्षा कॉलनी येथे समस्या असल्याचे सांगण्यात आले. कॅम्पस येथे नविन लाईन चार्ज केलेली आहे. सुरेन्द्रगढ शास्त्रीनगर चा ईएसआर शिफ्ट करावयाचा आहे या महिन्यात काम होवून जाईल असे सांगण्यात आले. पांढराबोडी संजय नगर, चे काम 15 दिवसात होईल. अशी माहिती विभागाव्दारे देण्यात आली. जी.एस.आर. ई.एस.आर. ची समस्या दुर करण्यात यावी असे निदेशित करण्यात आले. आजाद नगर, नेताजी मार्केट सिताबर्डीची एक डिसेंबरची तकार असल्याचे सांगण्यात आले. दाभा पांढराबोडी, भीमसेनखोरी येथील जगदीश ग्वालबंशी यांची तकार आहे. तसेच मा. श्री संजय बंगाले यांची तकार व धंतोली धरमपेठ ची पब्लीक तकार आहे असे सांगण्यात आले तेथील भाग इफेक्ट झालेला आहे.रुपाली पान मंदीरचा भाग डिस्टर्ब झालेला आहे. काही भागात पहिल्या सारखे ओटे पर्यन्त पाणी येत नाही प्रेशर कमी झालेला आहे नगरसेवकांना कोनतेही फिटबॅक जात नाही ते गेले पाहिजे. मा. सदस्यांनी हजारी पहाड येथे ऑल्टरनेट डे पाणी सुरु असल्याची तकार केली ह्या तकारीवर ताबडतोब कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात आले.

झोन कमांक 3 व्दारे सांगण्यात आले की बालाजी विस्तार येथे मुळे मॅडमची तकार आहे येथे पार्वतीनगर,न्यु बाबुलखेडा, रामेश्वरी , लाडीकर लेआउट ,रहाटेनगर ,अभयनगर नालंदानगर ,ओंकारनगर येथील तकारी आहे काही भागात मिटर गतीने फिरतात यावर

विभागातर्फे सांगण्यात आले की जुनी लाईन बंद करण्यात आली नाही. रहाटेनगर 85 प्लॉट अभय नगर प्रेशर लो आहे ती तक्रार दुर करण्यात यावे असे निर्देशित करण्यात आले.

झोन क्रमांक 4 वंजारीनगर, कुंजीलालपेठ येथे लो प्रेशरची तक्रार आहे सतीश होले यांच्या क्षेत्रात पाणी कमी आहे. प्रेशर लो –आहे जमीन लेव्हलवर पाणी येत नाही. प्रभाग 33 मध्ये रिस्टोरेशन झालेले नाही श्रीमती वंदना भगत यांचे क्षेत्रात तक्रार आहे श्रीमती उषा पॅलेट चंदननगर , बॅक कालनी येथे तक्रार आहे. सर्व तक्रारी दुर करण्याचे निर्देशित करण्यात आले.

झोन क्रमांक 5 येथे 4 तकारी असल्याचे सांगण्यात आले निराला, विद्यानगर, धनंतरी नगर, चिटणीस नगर येथे लो प्रेशर आहे. आर्शीवाद नगर, ताजबाग, ओल्ड सक्करदरा भांडे प्लॉट, जवाहरनगर, सावित्रीबाई फुले नगर येथे दुषीत पाण्याची तक्रार आहे येथील रिस्टोरेशनचे काम करण्यात यावे. सर्वश्रीनगर ,दिघोरी येथे लो–प्रेशर आहे या संबधांत एक महिन्यात रिजल्ट मिळेल असे विभागातर्फे सांगण्यात आले. सेवादल नगर, निराला सोसायटी ची समस्या दुर करण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले.

पाण्याच्या कमतरते संबधात चर्चेत सांगण्यात आले की आता कन्हान वरुन जास्त पाणी घेतले पाहिजे पेंच वरुन कमी घेतले पाहिजे. विभागातर्फे सांगण्यात आले की मागणी नसल्यामुळे पाणी कमी घेण्यात येत आहे. यावर योग्य कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात आले.

ओ.सी.डबलु व्दारे श्री रहेमान यांनी माहीती दिली की आयसोलेशनवर काम चालु आहे 10 नविन लेआउट चार्ज करण्यात आले आहे.

झाने क्रमांक 6 मध्ये 3 तक्रारी लो–प्रेशरच्या आहे. सिताबर्डी, नाईक रोड, बजेरीया पार्ट 1 मेडीकलख पोलुटेट वॉटरचीही समस्या आहे. महाल येथे पाणी पुरवठा कमी झाला आहे ह्या समस्याचे निराकरण करण्याचे निर्देशित करण्यात आले.

झोन क्रमांक 7 मध्ये 5 तक्रारी आहे नाईकतलाव , महात्माफुले नगर, तांडापेठ मोतीपुरा, पाचपावली सेवादल लेआउट ,नारायनपेठ, प्रेमनगर गोंडपुरा येथे तकारी आहे ज्या लोकांनी तक्रार केली आहे विभागाने त्यांच्यासह भेटावे नागसेनवन ,संजय कॉलनी दत्तवाडी आंनंदनगर, धम्मदीप नगर ,अंबीकानगर, तेलीपुरा ,जम्मुदीप नगर येथे लो प्रेशर आहे बारसेनगर, ठककरग्राम येथे ऑटरनेट डे पाणी चालु आहे यावर गोलीबार चौक पर्यन्त ठिक आहे 2 जागी इंटरनल कनेक्न आहे 4–5 जागी शिप्टींग आहे असे विभागातर्फे सांगण्यात आले.

झोन क्रमांक 8 बद्दल सांगण्यात आले की 3 कम्पलेंट आहे लो प्रेशरचीही तक्रार आहे हनुमानगर, दिनबंधू सोसायटी ,सुभाशनगर ,पार्डी ,महाजनपुरा ,हनुमानगर तक्रारी आहे यावर विभागातर्फे सांगण्यात आले की खाटीकपुरा येथील तक्रार झालेली आहे. धोपटे

मोहल्लाही झालेला आहे. विनोबाभावेनगर ,मोदीनंदर 5/6 सुर्यकांत , टेकचंद सोनकुसरे , पराते तीन तक्रारी आहे विनोबाभावेनगर चो लाईन चेक करण्यात यावी. जुनी मंगळवारी येथे 50 परसेंट डाउन एरिया आहे त्यामुळे समस्या आहे तेथील समस्या जानेवारी शेवटपर्यन्त समाप्त होण्याची शक्यता विभागाव्दारे सांगण्यात आली. येथे कॅपेक्स चे प्रायारीटीवर काम दिले आहे तेथे समरच्या पहिले काम होईल असे विभागाव्दारे सांगण्यात आले.गरोबा मैदान जुना बगडगंज येथे नविन कनेक्शन कनेक्शन चालू केले आहे कॅपेक्सचे काम प्रायारीटीवर करावयाचे आहे 15 दिवसाचा वेळ लागेल असे विभागाव्दारे सांगण्यात आले.

झोन कमाक 9 च्या संदर्भात सांगण्यात आले की येथे 5 तक्रार आहे दुषीत पाण्यासंबंधात माता नगर, बाळभाउपेठ ,आहूजा नगर ,सन्याल नगर, हुडको कॉलनी कनेक्शनचे काम व्हावयाचे आहे असे विभागाव्दारे सांगण्यात आले की लोक तेथे मिटर लावू देत नाही तेथे लोकांची सभा घेवून स्थानीय मा. नगरसेवकांच्या सह सभा घेवून लोकांना समजविण्यात यावे एकाच वेळी 4 कंत्राटदारांना घेवून काम करण्यात यावे तेथील इक्रोचमेंट काढण्यात आलेले नाही. तेथे आवश्यक काम करण्याचे यावेळी निर्देशित करण्यात आले. राजगृह नगर येथे एका गलीत पोलुटेड वॉटरची तक्रार आहे तेथे पाईप लाईनवर इक्रोचमेंट असल्याबद्दल सांगण्यात आले. मिसाळलेआउट मध्ये 2 लाईन मध्ये प्राब्लेम आहे. बापु नगर येथे नविन कलेक्शन झालेले आहे बाकी कनेक्शन 10 दिवसात पूर्ण करण्यात यावे. असे निर्देशित करण्यात आले .ओसीडब्लु चे सिंग हे मिताली लेआउटचे समस्या संबंधात स्वतः निराकरण करतील अशी ग्वाही दिली. येथील कामा करीता ओसीडब्लु 6 अतिरिक्त माणसांचा पूरवठा करेल श्री प्रशांत ठाकूर यांना पुन्हा झोन मध्ये देण्यात आल्याचे सांगण्यात आले. . पूर्ण सोसायटीच्या कामाचा फिटबॅक देण्यासंबंधात सभेत सांगण्यात आले. आवश्यक तेथे डेलीगेट्सनी त्वरीत पत्र दिले पाहिजे. श्री धनविजय यांनी आताच तयार केलेल्या सिमेंट रोड ला ब्रेक करण्यात येत असल्याबददल ची तक्रार केली यावर पुर्व काम का करण्यात आलेले नाही या बद्दल नाराजी व्यक्त केली. जरीपटका बस स्टॉपचा अलाईनमेंट मिळत नसल्याबद्दल सांगण्यात आले.

झोन कमांक 10 मध्ये 8 तक्रारी असल्याचे सांगण्यात आले. गोधनी रोड येथे 4 तक्रार आहे मा बम्लेश्वरी नगर, गोधनीनगर, सदर , गडडीगोदाम जाफरनगर, तक्रार दुरुस्त करण्यात आली आहे. बाबाफरीदनगर , प्रकाशनगर ,गोधनीनाका, पंजाबीलाईन , येथे समस्या आहे धर्मसिंगचाल, येथे रेल्वेची जागा आहे बोरवेल करीता पत्र आलेले आहे. पाईप लाईन टाकण्याकरीता तेथे विनंती करण्यात आलेली आहे. मा.सदस्या श्रीमती निकोसे यांच्या क्षेत्रातील समस्याचे निराकरण करण्यात यावे. त्यांच्या समस्येकरीता ते अनशनवर बसनार आहे अशी माहीती देण्यात आली. खलासीलाईन मोहनगर, येथे लाईन पोलूटेड आहे जुनी लाईन काढण्यात यावी. 20–25 घरात व्हीजीट देवून चेक करावे डिसेंबर शेवटपर्यन्त काम होवून जाईल असे विभागातर्फे सांगण्यात आले. 32 लोकांची तक्रार पोलूटेड पाण्या संबंधात

आहे. अशी माहीती देण्यात आली यावर सभापती यांनी समस्याचे त्वरीत निराकरणासंबंधात निर्देश दिले.

ओ.सी.डबलु व्दारे माहिती देण्यात आली की 3500 पैकी 1500 इंटर कनेकशन झालेले आहे यावर कामाची गती वाढविण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले. मीटर चोरी होत असलेल्या संमस्ये सबंधात योग्य सोलूशन काढण्यात यावे. 24 बाय 7 चे उद्देश पूर्ण होईल ह्या दिशेने काम करावे. डेलीगेट्सनी कामाच्या डिलेवर नियमानुसार दंड लावावा , पाणी बकाया वसुली संबंधात योग्य नियोजन करुन वेगळी सभा घेवून कार्यवाही करण्यात यावी या समस्यावर योग्य कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले. मा. सदस्य श्री भुट्टो यांनी दुषीत पाणी असलेल्या तक्रारीवर पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. बोरीयापुरा येथे समस्या आहे. मेओ हॉस्पीटलच्या परिसरात टाकी बनविणे आवश्यक आहे ओसीडब्लु ने गड्ढे खोदले आहे रिस्टोरेशन 2–3 महिन्यापासुन झालेले नाही. म्हाडाच्या वसुली संबंधात योग्य कार्यवाही करण्यात यावी असे सुचित करण्यात आले.

यानंतर सभेची कार्यवाही स्थगीत करण्यात आली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
जलप्रदाय विशेष समितीची